| वर्ष - 8 । अंक - 57 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

बैलपोळ्याच्या सर्व शेतकरी बांधवांना हार्दिक शुभेच्छा!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 02 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# धक्कादायक! राष्ट्रवादीच्या माजी नगरसेवकावर भरचौकात गोळीबार!

## कोयत्याने सपासप वार, वर्चस्व वादातून गोळीबार झाल्याचा प्राथमिक अंदाज

। पुणे ।महाईन्यूज

**पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्यावर अंधाधुद गोळीबार करण्यात आला आहे. घटना काही वेळापूर्वी नानापेठ परिसरात घडल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. आधी परिसरातील लाईट घालवण्यात आली आणि त्यानंतर वनराज आंदेकर यांना एकट्याला गाठून त्यांचावर अंधाधुद गोळीबार करण्यात आला.**

काही कळण्याआधीच पुन्हा हल्लेखोरांनी त्यांचावर कोयत्याने सपासप वार केले अशी माहिती मिळत आहे. घटना घडताच प्रत्यक्षदर्शी लोकांनी तातडीने वनराज आंदेकर यांना रुग्णालयात हलवले पण गोळीबारात अधिक रक्तस्त्राव झाल्याने आंदेकर यांचा मृत्यू झाला अशी माहिती समोर येत आहे.

### कसा घडला गुन्हा?

गोळीबार करून हल्लेखोरांनी कोयत्याने वार केले अशी माहिती प्रकरणातील मिळत आहे. आधी परिसरातील आणि नानापेठ चौकातले लाईट आरोपींनी घालवले त्यानंतर वनराज आंदेकर यांना एकटा असल्याचे पाहून हल्लेखोरांनी हल्ला केला. काही कामानिमित्त आंदेकर नानापेठेत गेल्याची माहिती प्राप्त होत आहे. आंदेकर यांचा काही घरगुती कार्यक्रम असल्यामुळे आंदेकर यांच्यासोबत इतर सहकारी किंवा कार्यकर्ते नव्हते. हल्लेखोरांनी नेमकी हीच संधी साधून हल्ला केला. आधी बाइकवरुन आलेल्या तीन ते चार जणांनी वनराज आंदेकर यांच्यावर गोळ्या झाडल्या आणि त्यानंतर कोयत्याने सपासप वार केले. गंभीर जखमी झालेल्या आंदेकर यांना तातडीने केएम रुग्णालयात दाखल करण्यात आले परंतू त्यांची प्राणज्योत मालवली.

घटनेतील संशयित आरोपी म्हणून गणेश लक्ष्मण कोमकर, सोमनाथ सयाजी गायकवाड, तुषार आबा कदम अशी नावे समोर येत आहे. पोलीसांनी गुन्हा नोंदवत पुढील प्रक्रिया सुरु केली असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.






हल्ल्याची माहिती मिळताच गुन्हे पुणे शाखेने घटनास्थळी धाव घेतली असून पूर्व वैमान्यातून हा हल्ला झाला असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून वर्तवण्यात येत आहे.यादरम्यानच्या काही काळ परिसरातील लाईट गायब झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली होती. गोळीबारामागचे कारण समजू शकले नाही. वर्चस्वाच्या वादातून गोळीबार करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### राजकीय पार्श्वभूमी अशी...

**विशेष म्हणजे वनराज आंदेकर यांच्या मातोश्री राजश्री आंदेकर या देखील २००७ आणि २०१२ या दोन वेळा नगरसेविका होत्या. वनराज आंदेकर यांचे चुलते उदयकांत आंदेकर हेही नगरसेवक होते. २०२० त्यांचं देखील अल्पश्या अजाराने निधन झाले आहे. त्यांच्या कुटुंबातील वत्सला आंदेकर यांनी पुणे शहराचा महापौरपद भुषविले आहे. १९९८-९९मध्ये पुणे महापालिकेच्या महापौर म्हणून निवडून आल्या होत्या.**

# रस्तोरस्ती लावणार ‘रोडरोमिओं’चे फलक

## छेड काढणाऱ्यांची परेड, पुणे पोलिसांचा मोठा निर्णय

।पुणे ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

गणेशोत्सवात देखावे पाहायला आणि गणपतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या महिला आणि तरुणींची छेड काढून त्रास देणाऱ्या रोडरोमिओंची छायाचित्रे रस्तोरस्ती, भरचौकात फ्लेक्सवर प्रसिद्ध करण्याचा निर्णय पुणे पोलिसांनी घेतला आहे. रोडरोमिओंना धडा शिकवण्यासाठी पोलिसांनी हा उपाय शोधला आहे. तसेच,



रोडरोमिओंची परेड देखील घेतली जाणार आहे. पुण्याच्या गणेशोत्सवासाठी राज्याच्या कानकोपऱ्यातून आणि देश-विदेशातून लोक येत असतात. विशेषत: विसर्जन मिरवणूक गणेशोत्सवाचे मुख्य आकर्षण असून, लक्ष्मी रस्त्यासह मध्यवर्ती भागात मोठ्या प्रमाणावर गर्दी असते; तसेच गणेशोत्सवाचे दहाही दिवस देखावे पाहण्यासाठी लोक गर्दी करतात. या गर्दीचा गैरफायदा घेऊन चोरटे नागरिकांच्या मुद्देमालावर डोळा ठेवून असतात. तर, काही जण महिला, तरुणींसोबत अश्लील वर्तन करतात, असे दिसून आले आहे. त्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी महिला, मुलींचा छेड काढणाऱ्यांना निर्वाणीचा इशारा दिला आहे.

### पुणे पोलीस ॲक्शन मोडवर...

‘गणेशोत्सवात सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पोलिसांकडून खबरदारी घेतली जाते असून, महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले आहे. त्यासाठी महिला पोलिस, दामिनी मार्शलची पथके नेमण्यात येणार आहेत. गुन्हे शाखेच्या पथकांना छेडछाड करणाऱ्या रोडरोमिओंवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. महिलांच्या सोबत गैरकृत्य करताना कोणी आढळून आल्यास, त्यांचे फोटो काढून शहरात फ्लेक्सवर नावासह लावणार आहेत. त्यांची रस्त्यावर परेड सुद्धा घेणार आहेत,’ अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिली.

# केंद्र व राज्य सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यात भाजप यशस्वी!

## शहराध्यक्ष शंकर जगताप: भाजपा चिंचवड विधानसभा अधिवेशन; 120 महिलांचा भाजपमध्ये प्रवेश

। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्र व राज्य शासनाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात भारतीय जनता पक्ष यशस्वी ठरला आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, युवकांसाठी युवा प्रशिक्षणाच्या माध्यमातून लाभ देऊन त्यांना आत्मनिर्भर बनवण्याचे काम महायुतीचे सरकार करीत आहे, जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी भाजपच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी बुथ स्तरावर जाऊन शासनाच्या योजनांची माहिती पोचवण्याचे काम अधिक प्रभावीपणे करावे, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले. चिंचवड विधानसभा विस्तारित कार्यकारिणी अधिवेशन आज वाकड येथे पार पडले. यावेळी आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पदाधिकारी, कार्यकर्ते, बूथ प्रमुख यांना मार्गदर्शन करताना शहराध्यक्ष शंकर जगताप बोलत होते. प्रसंगी, महायुती सरकारने महिला भगिनींसाठी सुरू केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेला प्रोत्साहित होवून 120 महिलांनी भाजपमध्ये प्रवेश केला.**




यावेळी, प्रमुख मार्गदर्शक माजी राज्यमंत्री संजय भेगडे, आमदार अश्विनीताई जगताप, माजी महापौर उषा ढोरे, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस नामदेव ढाके, महेश कुलकर्णी, चिंचवड विधानसभा प्रमुख काळुराम बारणे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष राजेंद्र राजापुरे, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष मनोज तोरलमल, मंडळ अध्यक्ष सोमनाथ भोंडवे, संदीप नखाते, प्रसाद कस्पटे, भाजपा उपाध्यक्ष रविंद्र देशपांडे, बिभीषण चौधरी, भारती विनोदे, अजित कुलथे, मधुकर बच्चे, संदीप गाडे, माजी नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, विनायक गायकवाड, सागर आंघोळकर, नीता पाडाळे, हरीश मोरे, शोभा जांभूळकर, पल्लवी वाल्हेकर, पियुशा पाटील यांच्यासह चिंचवड विधानसभेतील प्रदेश पदाधिकारी, नगरसेवक – नगरसेविका, जिल्हा पदाधिकारी, मोर्चा / आघाडी / प्रकोष्ठ प्रमुख, मंडल अध्यक्ष, मंडल पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख, बुथ प्रमुख व कार्यकर्ते आदी उपस्थित होते. प्रसंगी, आमदार अश्विनी जगताप यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. माजी राज्यमंत्री संजय भेगडे म्हणाले कि, महाराष्ट्राच्या राजकारणात पिंपरी चिंचवडचा प्रभाव राहिला आहे. राज्यातील पहिले विधानसभा अधिवेशन चिंचवड येथे पार पडत आहे.

शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वात दोन महत्वाच्या निवडणुकांमध्ये यश मिळाले आहे, आगामी विधानसभा निवडणुकीतही चिंचवडसह पुणे जिल्ह्यातील २१ विधानसभा निवडणुका महायुतीच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी सर्वांनी सर्वतोपरी प्रयत्न करावे. विरोधकांकडून फेक नरेटिव्ह पसरविण्यात येत आहेत. त्यांना वेळीच सामोरे जावून उत्तरे द्या. शंभर टक्के मतदार टक्का वाढविण्यासाठी आतापासून बुथ प्रमुखांनी कामाला लागा, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चिंचवड विधानसभा संयोजक काळूराम बारणे यांनी केले. शोक प्रस्ताव शशिकांत कदम यांनी मांडला. नवमतदार नोंदणी अभियान व मतदार यादीचा अभ्यास, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्र सरकारचा अभिनंदन, महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीय कल्याणकारी योजना व संविधान जागर, लाडकी बहिण योजना, पिंपरी चिंचवड मनपा मध्ये भाजपने केलेली विकासकामे व शहराच्या हितासाठी घेतलेले निर्णय याबाबत माजी महापौर उषा ढोरे, नामदेव ढाके, राजेंद्र राजापुरे, मनोज तोरडमल, बिभीषण चौधरी यांनी ठराव मांडून त्यांना अनुमोदन देण्यात आले. सुत्रसंचलन मोरेश्वर शेडगे तर आभार संदीप कस्पटे यांनी मानले.

> “ आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चिंचवड विधानसभा विस्तारित कार्यकारिणीचे अधिवेशन वाकड येथे घेण्यात आले. मावळ लोकसभा निवडणुकीत चिंचवडमधून महायुतीच्या उमेदवाराला ७५ हजाराहून अधिक मताधिक्क्य मिळाले. चिंचवड विधानसभा आमदार महाराष्ट्रातून सर्वाधिक मताधिक्याने निवडून आणण्याचा संकल्प कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी केला आहे. त्यासाठी प्रभावीपणे सदस्य नोंदणी आणि मतदार नोंदणी अभियान राबविण्यात येणार आहे.
>
> – **शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा पिंपरी चिंचवड शहर

---

# मुंडेंकडे जबाबदारी अन् मुळीकांच्या आशा पल्लवीत!

## मतदारसंघांची जबाबदारी विविध नेत्यांकडे सोपवून त्याचे सूक्ष्म निरीक्षण करण्याचे नियोजन

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अवघ्या काही महिन्यावर आलेल्या विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी भारतीय जनता पक्षाकडून सुरू करण्यात आली आहे. लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या विधानसभा मतदारसंघांची जबाबदारी विविध नेत्यांकडे सोपवून त्याचे सूक्ष्म निरीक्षण करण्याचे नियोजन भाजपने सुरू केले आहे.**





होत असलेल्या सहा विधानसभा मतदार संघांची जबाबदारी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि माजी मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे देण्यात आली आहे.पुण्यातील तीन मतदार संघाची जबाबदारी माजी मंत्री आणि विधान परिषदेच्या आमदार पंकजा मुंडे यांच्याकडे पक्षाने दिली आहे. यामध्ये वडगावशेरी विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. कॉँग्रेस चे सुनील टिंगरे हे विद्यमान आमदार असून ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाचे आहेत. आगामी विधानसभा निवडणुका महायुतीच्या माध्यमातून लढविण्याचा निर्णय राज्यात सत्ताधारी असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी घेतला आहे. त्यानुसार जागांची वाटप केले जाणार आहे. मतदारसंघांमध्ये ज्या पक्षाचा विद्यमान आमदार असेल ती जागा संबंधित पक्षाला सोडली जाईल अशी प्राथमिक चर्चा महायुतीच्या नेत्यांमध्ये झालेली आहे.

### उमेदवारी मिळण्यासाठी मुळीक प्रयत्नशील

उमेदवारी मिळावी यासाठी माजी आमदार आणि भाजपाचे माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक प्रयत्नशील आहेत. लोकसभेच्या उमेदवारीसाठी देखील त्यांनी जोर लावला होता. उमेदवारी जाहीर होण्याच्या आल्या दिवसापर्यंत मुरली मोहोळ यांच्या बरोबरच जगदीश मुळीक यांच्या नावाची जोरदार चर्चा होती. मुळीक यांनी या काळात शहरातील विविध भागात मोठ मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन करून चांगली चुरस निर्माण केली होती. भाजपाने मोहोळ यांना उमेदवारी दिल्यानंतर दोन दिवसात नाराजी विसरून मुळीक त्यांच्या प्रचारात सहभागी देखील झाले होते. पक्षाकडून त्यांना पुढील काळात संधी देण्याचा शब्द दिल्याने आपली नाराजी बाजूला ठेवत ते प्रचारात उतरल्याची चर्चा होती.

## पिंपरी-चिंचवड:भाजपा आमदार महेश लांडगे यांनी साधला नागरिकांशी संवाद

# जलस्वयंपूर्ण बनवण्याची संकल्पपूर्ती!

### आंद्रा भामा आसखेडचा दुसरा टप्पा जून-2025 पर्यंत पूर्ण होणार

। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**भविष्यातील २०४१ मधील संभाव्य लोकसंख्या गृहित धरुन शहराला पाणी पुरवठ्याचे स्त्रोत निर्माण करण्याच्या दृष्टीने आम्ही काम करीत आहोत. आंद्रा भामा आसखेड प्रकल्पातील पहिल्या टप्प्यात १०० एमएलडी पाणी शहरात दाखल झाले. आता दुसऱ्या टप्प्याचे काम जून- २०२५ पर्यंत पूर्ण होईल. त्याद्वारे १६८ एमएलडी पाणी मिळणार आहे. पवना बंद जलवाहिनी प्रकल्पावरील 'जैसे थे' आदेश रद्द केला आहे. निगडी जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता वाढवली आहे. समाविष्ट गावांतील विविध ठिकाणी जलकुंभ आणि नवीन जलवाहिनीचे काम सातत्याने सुरू आहे. विशेष म्हणजे, आगामी काळात मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाणी आरक्षीत करावे. या करिता राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे, अशी माहिती भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिली.**




भोसरी विधानसभा मतदार संघातील आमदार महेश लांडगे यांनी 'जलस्वयंपूर्ण पिंपरी-चिंचवड' या मुद्यावर पिंपरी-चिंचवडकरांशी 'सोशल मीडिया'द्वारे संवाद साधला.

आमदार लांडगे म्हणाले की, महाराष्ट्राची सांस्कृतिक व शैक्षणिक राजधानी असलेल्या पुण्यासोबत वेगाने विकसित होणारे आपले पिंपरी-चिंचवड शहर. महाराष्ट्रातील सर्वात मोठे ५ व्या क्रमांकाचे आणि देशातील १९ व्या क्रमांकाचे शहर आहे. भारताच्या कानाकोपऱ्यातून वास्तव्य करणाऱ्या नागरिकांचा 'मिनी इंडिया' असलेले आपले शहर 'स्मार्ट सिटी' आणि आता मेट्रो सिटी म्हणून ओळखले जात आहे, ही निश्चितच पिंपरी-चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब आहे.

सुरुवातीला पिंपरी-चिंचवड नगरपरिषदेची स्थापना दि. ४ मार्च १९७० रोजी झाली. त्यानंतर दि. ११ ऑक्टोबर १९८२ रोजी महानगरपालिका स्थापन झाली. त्यावेळी शहराची लोकसंख्या अवघी २ लाख ३५ हजारांच्या घरात होती. गेल्या ४२ वर्षांमध्ये शहराची लोकसंख्या ३० लाखांवर पोहोचली आहे. या काळामध्ये शहराची हद्दवाढ १९८२ आणि १९९७ अशी दोनवेळा झाली. पण, त्या तुलनेत जलस्त्रोत निर्माण झाले नाहीत.

**पिंपरी-चिंचवडकरांची साथ मिळाली...**

शहराच्या स्थापनेपासून पवना धरण हा एकमेव जलस्त्रोत होता. वाढती लोकसंख्या आणि नागरीकरण यामुळे नवीन जलस्त्रोतांची निर्मिती करणे काळाची गरज होती. अन्यथा शहरात पाणी संकट उभा राहिले असते. किंबहुना आजही समाविष्ट गावांतील अनेक सोसायट्यांमध्ये पाणी समस्या आहे. त्यामुळेच "पिंपरी-चिंचवडचा पाणीप्रश्न सोडवू" असे आश्वासन देत आम्ही २०१४ मध्ये भोसरी विधानसभा निवडणूक लढवण्याचा निश्चय केला. मतदार संघातील सूज्ञ पिंपरी-चिंचवडकरांनी साथ दिली आणि मला आपला प्रतिनिधी म्हणून विधिमंडळ सभागृहामध्ये काम करण्याची संधी मिळाली. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यामुळे आम्ही आंद्रा, भामा-आसखेड पाणी पुरवठा प्रकल्प हाती घेतला. त्याद्वारे २६८ एमएलडी पाणी भोसरी मतदर संघातील तळवडे, चिखली, मोशी, डुडुळगाव, चऱ्होली या भागातील नागरिकांसाठी आरक्षीत करण्यात आले आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

#### पिंपरी-चिंचवडच्या शाश्वत विकासाचे ध्येय...

आंद्रा-भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेंतर्गत तळवडे येथे १०० एमएलडी जॅकवेल उभा करणे. तसेच, तळवडे ते चिखली जलशुद्धीकरण केंद्र, १०० एमएलडी पाणी पुरवठा वाहिनी, १०० एमएलडी जलशुद्धीकरण केंद्र असे प्रकल्प कार्यान्वीत झाले आहेत. १६८ एमएलडी जलशुद्धीकरण केंद्राची 'वर्क ऑर्डर' देण्यात आली आहे. आता भामा- आसखेड प्रकल्पातील धरणामध्ये बांधण्यात येणाऱ्या जॅकवेलचे काम व थेट पाईपलाईनने पाणी पुरवठा करणे हे काम प्रगतीपथावर असून, जून २०२५ पर्यंत भामा आसखेड प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वयीत होणार आहे. पिंपरी-चिंचवड शहराला जलस्त्रोतांमध्ये "आत्मनिर्भर" करण्यासाठी आणि शहराच्या शाश्वत विकासासाठी मी अत्यंत प्रामाणिकपणे काम करीत आलो आहे. विकास ही निरंतर प्रक्रिया आहे, अशी माझी भावना आहे. या पुढील काळात आपल्या साथीने आणि आशिर्वादाने "जल स्वयंपूर्ण पिंपरी-चिंचवड" चे ध्येय निश्चितपणे साध्य करेन, असा विश्वास देतो. "देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो आणि या देशाचे आपण देणे लागतो..." या विचाराने आजवर काम करीत आलो आहे, यापुढेही करीत राहीन, असा 'शब्द'ही आमदार महेश लांडगे यांनी यावेळी पिंपरी-चिंचवडकरांना दिला आहे.

---

## गणेशोत्सव निर्विघ्नपणे होण्यासाठी मंडळांचे सहकार्य महत्वाचे

### पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, गणेशोत्सव 2024 नियोजन बैठक उत्साहात

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**यंदाचा गणेशोत्सव शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील गणेश मंडळांचे सहकार्य महत्वाचे असल्याचे मत पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी व्यक्त केले आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांच्या वतीने ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, आकुर्डी येथे गणेशोत्सव २०२४ नियोजन बैठक व "श्री.मोरया पुरस्कार २०२३" वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.**



या कार्यक्रमास पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त विशाल गायकवाड, पोलीस उप आयुक्त बापू बांगर, पोलीस उप आयुक्त डॉ. शिवाजी पवार, महापालिकेचे मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उप आयुक्त अण्णा बोदडे तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार आणि शहरातील विविध गणेश मंडळांचे तसेच सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे म्हणाले की, गणेशोत्सवाच्या माध्यमातून सर्व समाजाला एकत्र आणण्याची संकल्पना लोकमान्य टिळकांनी आणलेली आहे. यंदाचा गणेशोत्सव शांततापुर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी पोलीस आयुक्तालय कटिबद्ध असून यामध्ये गणेश मंडळांचे सहकार्यही तितकेच महत्वाचे आहे. तसेच पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आयोजित प्रोत्साहनपर गणेशोत्सव स्पर्धेत पुढील वर्षी छोट्या गणेश मंडळांनाही सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न केले जातील आणि सुरूवातीपासूनच गणेश मंडळांनी केलेल्या विविध उपक्रमांचे परिक्षण करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल जेणेकरून कोणतेच मंडळ स्पर्धेपासून वंचित राहणार नाही. पारंपारिक पद्धतीने पर्यावरण पूरक गणपती उत्सव साजरा करावा. गणेशोत्सव दरम्यान स्वयंसेवक म्हणून काम करण्यास इच्छुक असतील तर त्यांना ट्रेनिंग द्यावे. गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना केलेल्या परिसरात आग प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच मंडपाजवळ काही अनोळखी, संशयीत, बेवारस वस्तु उदा. सुटकेस, रेडिओ, मोठे घड्याळ, जेवणाचे डबे,

#### पर्यावरणपूरक गणेशोत्सव; विविध उपक्रम

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह म्हणाले, यावर्षी शहरातील गणेश मंडळांच्या सोयीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करून परवाना उपलब्ध करून देण्याची सुविधा देण्यात आली आहे, जेणेकरून त्यांना कोणत्याही कार्यालयात उपस्थित राहून अर्ज करण्याची गरज पडणार नाही. सर्व गणेश मंडळांनी या प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज करावेत जेणेकरून त्यांना कोणत्याही अडचणीला सामोरे जावे लागणार नाही. याशिवाय सार्वजनिक गणेश मंडळांना महापालिकेच्या जागेवर मंडप किंवा स्टेज व कमानी आदींसाठी परवाना शुल्क माफ करण्यात आले आहे. तसेच शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

# कशी फोडणार निवृत्तिवेतनाची कोंडी?



## भूमिका

**आपल्या देशात एका विशिष्ट वयाच्या नागरिकांना निवृत्तिवेतन मिळते, पण ते सगळ्यांनाच मिळत नाही. काही ठरावीक लोकांनाच ते मिळते. नागरिकांना निवृत्तिवेतन देईल अशी कोणतीही सामाजिक सुरक्षा योजना आपल्या देशात नाही. खासगी क्षेत्रात नोकरी करणाऱ्या लाखो लोकांना निवृत्तीनंतर निवृत्तिवेतन मिळत नाही. भारतीय संरक्षण दलातील शॉर्ट सर्व्हिस कमिशन्ड अधिकाऱ्यांनाही निवृत्तिवेतन मिळत नाही.**

आपल्या देशातील लोकांचे सरासरी आयुर्मान कमी होते, तोपर्यंत निवृत्तिवेतन फार महत्त्वाचे ठरत नव्हते. काहींना निवृत्तिवेतन मिळाले, पण त्यांच्यापैकी निवृत्तीनंतर बराच काळ जगले, अशा लोकांची संख्या फार कमी होती. १९४७ मध्ये देश स्वतंत्र झाला तेव्हा देशातील लोकांचे सरासरी आयुर्मान ३५ वर्षांपेक्षा कमी होते. आज ते सरासरी ७० वर्षांपेक्षाही जास्त आहे. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्याच्या निवृत्तीनंतर सरासरी दहा ते १२ वर्षे पेन्शन सुरू राहते. ते कुटुंब निवृत्तिवेतन असल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या जोडीदाराला मिळत राहते. म्हणूनच बहुतेक निवृत्तिवेतनधारक निवृत्तिवेतनाबाबत आग्रही आहेत, असतात. या कर्मचाऱ्यांचा एक मुद्दा ठोस आहे, तो म्हणजे निवृत्तिवेतन हा दीर्घकाळच्या सेवेतून तसेच ती निष्ठेने केली म्हणून त्यांना



मिळालेला हक्क आहे; किंवा निवृत्तिवेतन हा त्यांच्याच वेतनातून बाजूला ठेवलेला भाग आहे; किंवा निवृत्तिवेतन म्हणजे निवृत्तीनंतर सन्मानाने जगण्याचा हक्काचा मार्ग.सरकारी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत 'निवृत्तिवेतनाचा हक्क' हा युक्तिवाद निकालाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. काही लोकांना निवृत्तिवेतन मिळत नाही, असे या चर्चेदरम्यान मांडले गेले. त्याला उत्तर असे दिले गेले की, मग निवृत्तिवेतनाच्या अधिकाराची व्याप्ती वाढवून तो त्यांच्यापर्यंत पोहोचवला पाहिजे. खरे तर सर्व स्तरातील लोकांसाठी सार्वत्रिक पेन्शन योजना असायला हवी. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी निवृत्तिवेतन योजना रुजली म्हणून, किमान खात्रिशीर निवृत्तिवेतन ही संकल्पनाही रुजली. संबंधित कर्मचाऱ्याचे शेवटचे मूळ वेतन आणि ५० टक्के महागाई भत्ता असे तिचे स्वरूप निश्चित झाले. जानेवारी २००४ मध्ये जुन्या निवृत्तियोजने (ओपीएस) ची जागा नवीन निवृत्तियोजने (एनपीएस) ने घेतली, तेव्हा निवृत्तिवेतन योजनेचे दोन स्तंभ विस्कळीत झाले. आधीच्या योजनेत आमूलाग्र बदल केले गेले आणि किमान निवृत्तिवेतन ही संकल्पना बाजूला केली. त्यामुळे आंदोलने सुरू झाली. तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी बधले नाहीत आणि त्यांच्यानंतर आलेले, त्यांचे उत्तराधिकारी डॉ. मनमोहन सिंग यांनीही त्यांच्या दहा वर्षांच्या कारकीर्दीत या मुद्द्याला हात घातला नाही. त्यांच्यानंतर आलेल्या नरेंद्र मोदी यांनीही आपल्या पंतप्रधानपदाच्या काळात हेच केले. पण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील निकालाने परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे.३ ऑगस्ट २०२२ रोजी पीआयबीने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारच्या पेन्शनधारकांची एकूण संख्या ६९ लाख ७६ हजार २४० होती. २०२४-२५ मध्ये निवृत्तिवेतनावरील अंदाजपत्रकीय तरतूद २ कोटी ४३ लाख २९६ रुपये आहे. माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्च २०२३ पर्यंत केंद्र सरकारचे २३.८ लाख आणि राज्य सरकारचे ६०.७ लाख निवृत्तिवेतनधारक होते. २०२४ मध्ये, ही आकडेवारी थोडीफार कमीजास्त असू शकते. देशाची एकूण लोकसंख्या पाहता ही आकडेवारी फार नाही. जुनी निवृत्तिवेतन योजना म्हणजेच विनानिधी पेन्शन योजना अर्थव्यवस्थेला आर्थिक संकटाकडे नेईल. सरकारे सध्याच्या महसुलातून 'पे अॅज यू गो' पद्धतीने निवृत्तिवेतन देऊ शकत नाहीत. पण निवृत्तिवेतन योजनेसाठी सरकार किंवा कर्मचारी यांच्यापैकी कोणीतरी पैसा उभा करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना म्हणजेच एनपीएससाठी सरकार सरकारने जाहीर केलेल्या युनिफाइड पेन्शन योजनेत (यूपीएस) सरकार (१८.५ टक्के) आणि कर्मचारी (१० टक्के) योगदान देणार आहते. यूपीएसने किमान २५ वर्षे सेवा पूर्ण करणाऱ्यांना निवृत्तीच्या आधीच्या १२ महिन्यांत काढलेल्या सरासरी मूळ पगाराच्या ५० टक्के किमान निवृत्तिवेतनाची हमी दिली आहे.

## प्रासंगिक »

### स्वागतार्ह दरवाढ!

***राज्यास भारनियमनापासून वाचवण्यासाठी 'महावितरण'ने महाग वीज खरेदी केल्यामुळे काही काळ देयकेही वाढणार, त्यात राजकीय आडकाठी नसणे योग्यच..***

कनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या पहिल्या काही दिवसांतच इंधन समायोजन निमित्ताने वीज दरवाढ मार्गी लागली, याचे मन:पूर्वक स्वागत. हा या सरकारचा प्रशासकीय निर्णय नसला, तरी सरकारने यात आडकाठी केली नाही हे महत्त्वाचे. याआधी शपथविधीनंतर या दोघांनीही पेट्रोल-डिझेलवरील मूल्यवर्धित कर कमी करण्याचा इरादा व्यक्त केला. पण तो अद्याप फक्त इरादा आहे आणि त्याचे प्रत्यक्ष निर्णयात रूपांतर व्हायचे आहे. संख्याधारित स्पष्टीकरण करण्याआधी या निर्णयामागील कार्यकारणभावदेखील समजून घ्यायला हवा. तोदेखील तितकाच महत्त्वाचा आणि म्हणून 'स्वागतार्ह' आहे. म्हणजे असे की राज्यात वीज वितरण करणाऱ्या कागदोपत्री स्वायत्त असणाऱ्या महावितरण कंपनीस कडेलोटाच्या उंबरठ्यावर नेण्यास याआधीचे फडणवीस सरकार आणि त्या सरकारात मंत्री असलेले शिंदे हे जबाबदार आहेत.

केंद्र सरकारच्या विद्युत मंत्रालयाने २०२० व २०२१ साली सर्व राज्यांनी मोठ्या प्रमाणात स्मार्ट मीटर बसवावेत असे धोरण, सुधारित वीज वितरण ( फऊरर) या योजनेअंतर्गत आखले. त्यासाठी सुमारे ९०० रुपये प्रति मीटर इतकी सबसिडी देखील देऊ केली.

## स्मार्ट व प्रीपेड वीज मीटर: वस्तुनिष्ठ दृष्टिकोन हवा

सर्व राज्यांत मिळून २० कोटीपेक्षाही अधिक स्मार्ट मीटर बसवण्याचे ध्येय ठेवले. केंद्र सरकारने स्पर्धात्मक बोलीद्वारे मीटर बसवणे, स्मार्ट मीटरसाठीची तांत्रिक मानके व आवश्यक इतर तांत्रिक यंत्रणांचे तपशील इत्यादीसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. या कार्यक्रमांतर्गत शेती वगळता इतर सर्व ग्राहकांना त्याचप्रमाणे विद्युत रोहित्र व उच्च दाबाच्या वीज तारजाळ्यांवर देखील असे स्मार्ट मीटर लावण्याचे निश्चित केले. त्यामुळे वीज वापर व त्यासंबंधी इतर माहिती म्हणजे वोल्टेज, मीटरवरील एकूण वीज भार इ. माहिती कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय स्मार्ट मीटरद्वारे ठरावीक वेळी (उदा. दर १५ मिनिटे, ३० मिनिटे, वा एक तास) स्वयंचलितपणे या मीटरमध्ये असणाऱ्या मोबाइल नेटवर्क सुविधेद्वारे एका केंद्रीय यंत्रणेमध्ये (सर्व्हर) साठवली जाते. याद्वारे ग्राहकांचा दर महिन्याचा



वीज वापर व त्यानुसार होणारे बिल हे वीज वितरण कंपन्यांना संपूर्णत: स्वयंचलित यंत्रणेद्वारे व डिजिटल माध्यमातून म्हणजेच एसएमएस व ईमेलद्वारे ग्राहकांना पाठवता येते. या स्मार्ट मीटरमध्ये वीज ग्राहकाने सोयीनुसार विजेचे बिल मोबाइल रिचार्जसारखेच आगाऊ भरण्याची सुविधा आहे. भरणा केलेल्या रुपयांचा वीज वापर संपल्यावर वीजपुरवठा आपोआप बंद होतो व पुन्हा पैसे भरल्यावर आपोआप वीजपुरवठा सुरू होतो. स्मार्ट मीटरमधील प्रीपेडची ही सुविधा वीज वितरण कंपनीच्या निर्णयावर अवलंबून असेल. या योजनेअंतर्गत आजपर्यंत सुमारे एक कोटी २९ लाख स्मार्ट मीटर बिहार, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यांमध्ये बसवण्यात आले आहेत.येत्या काळात भारतातील एकूण वीजपुरवठ्यात अक्षय ऊर्जेचा म्हणजेच सौर ऊर्जा व पवन ऊर्जा यांचा वापर वाढणे किफायतशीर असल्यामुळे, . नियामक आयोगाने ग्राहकांसाठी निर्धारित केलेली वीजपुरवठ्याची मानके (वोल्टेज लेव्हल कमी-जास्त होणे, वीजपुरवठ्यातील व्यत्यय इ.) वीज वितरण कंपन्यांनी न पाळल्यास त्यांना दंड करणे व दंडाची रक्कम लगेचच स्मार्ट मीटरमध्ये जमा करणे, स्मार्ट मीटरमुळे शक्य होईल. वीजगळती, वीज चोरी व त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई वेळेवर व प्रामाणिकपणे विज बिल भरणाऱ्या सामान्य ग्राहकांनाच वाढीव वीज दराच्या रूपाने करावी लागते. स्मार्ट मीटरमुळे हे थांबून वीज कंपन्यांची एकूण कार्यक्षमता वाढून प्रामाणिक ग्राहकांना फायदा होईल असाही दावा करण्यात येतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाराष्ट्रात पावसाचा धुमाकूळ!

## मराठवाड्यात थैमान; अनेक जिल्ह्यांना रेड अलर्ट

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या मुसळधार पाऊस पडत आहे. विशेषत: मराठवाड्यात प्रचंड पाऊस पडत आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, काही जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट देण्यात आला आहे. पुणे हवामान विभागाचे प्रमुख के. एस. होसाळीकर यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे.**



राज्यात पुढचे चार ते पाच दिवस मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. येत्या 24 तासासांठी मराठवाडा, विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पावसाचा हा धुमाकूळ मध्य महाराष्ट्र आणि कोकणातही असण्याची शक्यता आहे. पावसाचा जोर उद्याही कायम असण्याची शक्यता आहे. या पावसाची तीव्रता 4 सप्टेंबरपासून कमी होण्याची शक्यता असल्याची माहिती के. एस. होसाळीकर यांनी दिली आहे. लातूर जिल्ह्यात गेल्या 24 तासांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. मुसळधार पावसामुळे छोटे-मोठे ओढे आणि नद्यांना पूर आला आहे. विशेष म्हणजे लातूरसाठी रेड अलर्ट देण्यात आला आहे. लातूर जिल्ह्यातल्या ग्रामीण भागातही पाऊस सुरूच आहे. त्यामुळे शेती पिकांचे मोठं नुकसान होत आहे. अनेक शेतात पाणी घुसल्याने पिकांचे नुकसान झालं आहे. लातूर जिल्ह्यातल्या उदगीर, अहमदपूर, रेणापूर, चाकुर, निलंगा भागात पिकांचे मोठं नुकसान झालं आहे.नांदेड जिल्ह्यामध्ये सकाळपासून जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे. दुपारी एकच्या नंतर हवामान खात्याने नांदेड जिल्हा रेड अलर्ट जाहीर केलेला आहे. जिल्ह्यातील 26 महसूल मंडळामध्ये अतिवृष्टी झाली आहे. त्याचबरोबर गोदावरी नदीसह इतर छोटे-मोठे नदी नाले दुथडी भरून वाहू लागले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून नांदेड जिल्ह्यात पावसाने उघडीप दिली होती. पण आज झालेल्या जोरदार पावसामुळे खरीप हंगाम धोक्यात आलं आहे. अनेक भागात शेतामध्ये पाणी साचलं आहे. त्यामुळे मूग, सोयाबीन सह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. नांदेड जिल्ह्यातील अनेक भागात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना सतर्कतेचे आदेश जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले आहेत. आपत्ती व्यवस्थापन विभाग स्थितीवर लक्ष ठेवून असून ज्या ठिकाणी मदतीची आवश्यकता आहे त्या ठिकाणी आवश्यक साधनसामुग्रीसह तैनात राहण्याची सूचना बचाव पथकांना केली आहे. जिल्ह्यातील ६३ मंडळांपैकी २६ मंडळांमध्ये ६५ मिमी पेक्षा अधिक पाऊस झाला आहे. किनवट, हिमायतनगर, हदगाव, भोकर, मुदखेड आदी तालुक्यात मोठ्या प्रमाणात मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे नदी नाल्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. नागरिकांनी धोक्याच्या ठिकाणी जाणे टाळावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. अति मुसळधार पावसानं वाशिम जिल्ह्यातील अनेक नदी-नाल्यांना मोठा पूर आला आहे. मानोरा ते कारंजा रस्ता दापुरा जवळच्या नाल्याला आलेल्या मोठ्या पुराने बंद झाला आहे. तसेच इंझोरी गावाजवळील नाल्याला मोठा पूर आल्यानं इंझोरी-जामदरा रस्ता बंद झाला आहे. शेतात गेलेले शेतकरी अडकल्यानं त्यांचे हाल होत आहेत. तर मंगरुळपीर तालुक्यातील कोठारी बोरव्हा परिसरातील नाल्यानाही मोठा पूर आला आहे. पोहरादेवी शिवारामधील शेतात पाणी घुसल्यानं शेतीचं अतोनात नुकसान झालं आहे.बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यात 24 तासांपासून पावसाची संततधार सुरु असल्याने नागापूर धरण ओव्हरफ्लो झाले आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला.

### लातूर जिल्ह्यात मुसळधार

लातूर जिल्ह्यात गेल्या 24 तासांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. मुसळधार पावसामुळे छोटे-मोठे ओढे आणि नद्यांना पूर आला आहे. विशेष म्हणजे लातूरसाठी रेड अलर्ट देण्यात आला आहे. लातूर जिल्ह्यातल्या ग्रामीण भागातही पाऊस सुरूच आहे. त्यामुळे शेती पिकांचे मोठं नुकसान होत आहे. अनेक शेतात पाणी घुसल्याने पिकांचे नुकसान झालं आहे. लातूर जिल्ह्यातल्या उदगीर, अहमदपूर, रेणापूर, चाकुर, निलंगा भागात पिकांचे मोठं नुकसान झालं आहे.

---

# छत्रपती शिवरायांनी सूरत लुटलं नाही : देवेंद्र फडणवीस

## उलट सूरतच्या लोकांनी तिथे छत्रपतींचा पुतळा बसवला

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**छत्रपती शिवाजी महाराजांचा राजकोटमधला पुतळा कोसळल्याने राजकारण चांगलंच पेटलं आहे. या घटनेवरुन सरकावर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी टीका केली. त्यानंतर महाविकास आघाडीने मोर्चा काढला आणि जोडे मारो आंदोलन केलं. या आंदोलनावर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस यांनी एक वाक्य उच्चारलं आणि विरोधकांना आयतं कोलीत हाती मिळालं.**

देवेंद्र फडणवीस यांनी जे वाक्य उच्चारलं त्यावरुन त्यांना ट्रोल केलं जातं आहे.छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचा स्वाभिमान... त्यांचा अवमान आम्ही खपवून घेणार नाही, असं म्हणत महाविकास आघाडीचे शेकडो कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी'चा जयघोष केला. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' असं म्हणत शेकडो कार्यकर्ते गेट वे ऑफ इंडियाच्या दिशेने रवाना झाले. तसंच गद्दारांना माफी नाही, शिवद्रोहींना माफी नाही अशा घोषणाही यावेळी देण्यात आल्या."मध्य प्रदेशात कमलनाथ मुख्यमंत्री असताना छत्रपती शिवरायांचा पुतळा बुलडोझरने हटवला. याची माफी काँग्रेस मागणार का? कर्नाटकात छत्रपती शिवरायांचा पुतळा तोडण्यात आला. त्याबद्दल काँग्रेस माफी मागणार का? स्वातंत्र्य मिळाल्यानंतर याच काँग्रेसने शिकवलं की छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत लुटली. छत्रपती शिवरायांनी सूरत लुटलीच नाही. उलट सूरतच्या लोकांनी तिथे छत्रपतींचा पुतळा बसवला आहे. तरीही काँग्रेसने शिकवण दिली की छत्रपती शिवरायांनी सूरत लुटलीयानंतर देवेंद्र फडणवीसयांना सोशल मीडियावर तुफान ट्रोल केलं जातं आहे. वाटलं होतं जरा विश्रांती घ्यावी... पण इतिहास पुन्हा पुन्हा मांडावाच लागणार.." मन वढाय वढाय उभ्या पिकातलं ढोर किती हाकला हाकला फिरी येतं पिकावर" या बहिणाबाईंच्या ओळी इतिहास बदलू पाहणाऱ्यांनासुद्धा लागू होतील अस वाटलं नव्हतं.



### जितेंद्र आव्हाड काय म्हणाले?

महाराजांनी सूरत लुटले नाही, चुकीचा इतिहास आहे, महाराजांच्या शौर्या वर आक्षेप. हा अक्षम्य गुन्हा आहे..एकदा नाही दोनदा लुटली ..फडणवीस साहेब महाराजांचा अपमान का केलात.देवेंद्र फडणवीस म्हणत आहेत शिवाजी महाराजांनी सुरत लुटली नाही, ही इतिहासाशी लबाडी आहे. शिवाजी महाराजांनी कोणत्याही गोर गरिबांना हात न लावता सुरत एकदा नव्हे दोनदा लुटली आहे फडणवीसांनी असेच बोलत राहावे. .फडणवीस गुजरात प्रेम उफाळून आलं आहे अशी टीका महाविकास आघाडीकडून केली जाते आहे. आता याबाबत देवेंद्र फडणवीस काही बोलणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

# महाराष्ट्रात दंगली का होत नाहीत?

## महाराष्ट्रात दंगली झाल्या पाहिजेत, खैरेंचं वादग्रस्त वक्तव्य

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**देशात कुठेही महापुरुषांच्या पुतळ्यांची तोडफोड केली तर त्या भागात दंगली होतात. मग छत्रपती शिवाजी महाराजांचा इतका मोठा पुतळा कोसळला आहे आणि आम्ही या सरकारच्या विरोधात बोलायचंसुद्धा नाही का?" असा प्रश्न शिवसेनेच्या ठाकरे गटाचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी उपस्थित केला आहे.**



### त्या पुतळ्याला कोणी धक्का लावला तर

उलट हे सरकार पदच्युत झालं पाहिजे. त्यांना याची शिक्षा मिळाली पाहिजे. अशा पद्धतीने कोणी छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करत असेल तर ते आम्ही सहन करणार नाही. कुठल्याही गावात एखाद्या महापुरुषाचा पुतळा असेल आणि त्या पुतळ्याला कोणी धक्का लावला तर तिथे मोठ्या दंगली होतात. आज इतका मोठा प्रकार घडला आहे आणि मला एक कळत नाही की या घटनेनंतर महायुती सरकारच्या विरोधात दंगली का होत नाहीत? त्या झाल्या पाहिजेत. आज महाराष्ट्रात आम्ही महाविकास आघाडी म्हणून आंदोलन करत आहोत. शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रमुख व ज्येष्ठ नेते शरद पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली आम्ही महायुती सरकारविरोधात जोडे मारो आंदोलन करत आहोत.

आठ महिन्यांपूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळला. हे पाहून महाराष्ट्र हळहळला, तसेच शिवप्रेमींमधून संतापाची लाट उसळली आहे. या घटनेचा निषेध म्हणून मुंबईत महाविकास आघाडीने आज (१ सप्टेंबर) 'जोडे मारो' आंदोलन केलं. महाविकास आघाडी या प्रकरणी आक्रमक झाली आहे. तर पोलिसांनी ठिकठिकाणी हे आंदोलन रोखण्याचा प्रयत्न केला. यावर, तुरुंगात टाकलं तरीही चालेल पण आंदोलन होणारच असा पवित्रा महाविकास आघाडीने घेतला आहे. अशातच माजी खासदार चंद्रकांत खैरेंनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. चंद्रकांत खैरे म्हणाले, जिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा असेल, किंवा इतर कोणत्याही महापुरुषाचा पुतळा असेल, त्या पुतळ्याची कोणी तोडफोड केली तर दंगली होतात. अख्खी गावं पेटवली जातात. सिंधुदुर्गमध्ये तर भला मोठा पुतळा कोसळला आहे आणि या सरकारविरोधात कोणी काहीच बोलत नाही. आम्ही देखील सरकारविरोधात बोलू नये असं वाटतं का? उलट हे सरकार पदच्युत झालं पाहिजे. त्यांना याची शिक्षा मिळाली पाहिजे. अशा पद्धतीने कोणी छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करत असेल तर ते आम्ही सहन करणार नाही. कुठल्याही गावात एखाद्या महापुरुषाचा पुतळा असेल आणि त्या पुतळ्याला कोणी धक्का लावला तर तिथे मोठ्या दंगली होतात. आज इतका मोठा प्रकार घडला आहे आणि मला एक कळत नाही की या घटनेनंतर महायुती सरकारच्या विरोधात दंगली का होत नाहीत? त्या झाल्या पाहिजेत. आज महाराष्ट्रात आम्ही महाविकास आघाडी म्हणून आंदोलन करत आहोत. शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रमुख व ज्येष्ठ नेते शरद पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली आम्ही महायुती सरकारविरोधात जोडे मारो आंदोलन करत आहोत. आम्हाला रोखलं तरी आम्ही हे आंदोलन चालूच ठेवणार. कितीही पोलीस आले तरी आम्ही मागे हटणार नाही. कारण आम्हाला या गोष्टींची सवय झाली आहे. आम्ही कित्येक वर्षांपासून राजकारणात, समाजकारणात सक्रिय आहोत. आता आम्ही मागे हटणार नाही. आठ महिन्यांपूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळला. हे पाहून महाराष्ट्र हळहळला, तसेच शिवप्रेमींमधून संतापाची लाट उसळली आहे. या घटनेचा निषेध म्हणून मुंबईत महाविकास आघाडीने आज (महाविकास आघाडी या प्रकरणी आक्रमक झाली आहे. तर पोलिसांनी ठिकठिकाणी हे आंदोलन रोखण्याचा प्रयत्न केला. यावर, तुरुंगात टाकलं तरीही चालेल पण आंदोलन होणारच असा पवित्रा महाविकास आघाडीने घेतला आहे. अशातच माजी खासदार चंद्रकांत खैरेंनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. चंद्रकांत खैरे म्हणाले, जिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा असेल, किंवा इतर कोणत्याही महापुरुषाचा पुतळा असेल, त्या पुतळ्याची कोणी तोडफोड केली तर दंगली होतात. अख्खी गावं पेटवली जातात. सिंधुदुर्गमध्ये तर भला मोठा पुतळा कोसळला आहे आणि या सरकारविरोधात कोणी काहीच बोलत नाही.

# आजपासून गॅस सिलिंडरच्या दरात मोठी वाढ

## व्यावसायिक गॅस सिलिंडरची किंमत 39 रूपयांनी वाढली

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**सप्टेंबर महिन्याच्या पहिल्याच दिवशी गॅस सिलिंडरचे नवीन दर जाहीर करण्यात आले आहेत. गॅस सिलिंडरच्या दरात आजपासून मोठी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे गॅस सिलिंडरचे नवीन दर आजपासून लागू होणार आहेत. या दरानुसार, आता व्यावसायिक गॅस सिलिंडरची किंमत ३९ रूपयांनी वाढली आहेत. त्यामुळे देशभरातील छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना धक्का बसला असून याचा फटका सर्वसामान्यांनाही बसणार आहे.**



### घरगुती सिलेंडरच्या दरात वाढ ?

मात्र, घरगुती सिलेंडरच्या दरात कोणताही बदल झालेला नाही. तेल कंपन्यांनी फक्त व्यावसायिक सिलिंडरच्या दरामध्येच वाढ केली असून घरगुती १४ किलोच्या गॅस सिलिंडरच्या किंमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.आज (१ सप्टेंबर) गॅस सिलिंडरचे नवीन दर जाहीर झाले आहेत. यामध्ये फक्त १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरच्या दरामध्येच वाढ झाली आहेतेल कंपन्यांनी फक्त व्यावसायिक सिलिंडरच्या दरामध्येच वाढ केली असून घरगुती १४ किलोच्या गॅस सिलिंडरच्या किंमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

आता १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किंमतीत ३९ रूपयांनी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे १९ किलोचा व्यावसायिक गॅस सिलिंडर आजपासून १ हजार ६९१ रुपयांना मिळणार आहे. तेल कंपन्यांनी एलपीजी सिलिंडरच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आजपासून हे नवे दर लागू करण्यात आले आहेत. यासंदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.दरम्यान, व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किंमतीत ३९ रूपयांनी वाढ करण्यात आल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना पुन्हा एकदा महागाईचा फटका बसणार आहे. आज जाहीर झालेल्या नव्या दरानुसार, आता संपूर्ण देशभरात व्यावसायिक गॅस सिलिंडरचे दर महागले आहेत. ही दरवाढ सिलिंडरच्या दरामध्येच असणार आहे.आजगॅस सिलिंडरचे नवीन दर जाहीर झाले आहेत. यामध्ये फक्त १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरच्या दरामध्येच वाढ झाली आहे.

# आशकानं दिली गोड बातमी!

टिव्ही मनोरंजन विश्वातून एक आनंदाची बातमी समोर आली आहे. नागिन फेम अभिनेत्री आशका गोराडिया ही आई झाली आहे. तिने एका गोंडस मुलाला जन्म दिला आहे. आशका गोराडिया आणि ब्रेंट ग्लोब यांनी त्यांच्या पहिल्या बाळाचे स्वागत केले आहे. स्वत: अभिनेत्रीनेच या वृत्ताला दुजोरा दिला आहे. आशका गोराडिया आणि ब्रेंट ग्लोब यांनी सोशल मिडियावर पोस्ट शेयर करत ही गोड बातमी चाहत्यांनी दिली आहे. यासोबतच त्यांनी सोशल मिडियावर बाळाचा पहिला फोटो आणि नावही जाहिर केलं आहे. हा फोटो पोस्ट करत त्याने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, 'आज सकाळी 7:45 वाजता विल्यम अलेक्झांडर या जगात आला आणि थेट आमच्या हृदयात गेला. जरी मला माहित आहे की माझे जीवन या दिवसापूर्वीही अस्तित्वात होते, मला त्याबद्दल फारच कमी आठवते. आतापासून, मी मरेपर्यंत ॲलेक्सचा बाबा असेन.देवाच्या कृपेने आशकाने त्याला जन्म दिला आहे. ती आता विश्रांती घेत आहे, तिच्या शेजारी आमचे लहान बाळ आहे. आमचे अंतःकरण इतके जड कधीच नव्हते. असे प्रेम मी कधीच पाहिले नाही. आणि आता दररोज, माझ्याकडे देवाच्या अस्तित्वाचा जिवंत पुरावा असेल. आता त्यांची ही पोस्ट सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. चाहते या जोडाप्याचे कौतुक करत आहेत. जुही परमार, आमिर अली, रिद्धिमा पंडित, जन्नत जुबेर, किश्वर मर्चंटपासून मौनी रॉय अशा अनेक कलाकारांनी या जोडप्याचे अभिनंदन करत आहे. 1 डिसेंबर 2017 रोजी आशकाने ब्रेंट गोबलशी ख्रिश्चन आणि हिंदू पद्धतीने विवाह केला होता.

# सलमान सोसाइटीचा टीजर प्रेक्षकांच्या भेटीला!

मनोरंजन विश्वात सध्या मराठी चित्रपटांची चांगलिच चर्चा आहे. आता त्यातच 'सलमान सोसायटी' हा मराठी चित्रपट गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आला आहे. नुकतच या चित्रपटातील पहिलं गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. 'पार्टी दणाणली...' असे या गाण्याचे बोल होते. या गाण्याला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. आता या चित्रपटाचा टीजर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. 'सलमान सोसायटी' हा चित्रपट शिक्षणावर भाष्य करतो. भारत देश साक्षर होईल तेव्हा भारताचा विकास होईल या आशयाचा हा सिनेमा आहे. चित्रपटाचा टीजर पाहिल्यानंतर चित्रपटाच्या कथेची कल्पना येते. एका लहानग्याला शाळेची ओढ या चित्रपटात दाखवली आहे. अनाथ मुलाची शिक्षण घेण्यासाठीची धडपड आणि त्यासाठी त्याने आणि त्याच्या सोबतच्या मित्रांनी लावलेली शक्कल या चित्रपटाच्या टिझरमध्ये दाखवण्यात आली आहे. या चित्रपटात गौरव मोरे एका वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. तसेच पुष्कर लोणारकर, शुभम मोरे आणि विनायक पोतदार हे बाल कलाकार या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. 'सलमान सोसायटी' चित्रपटाचे दिग्दर्शन कैलाश पवार व निर्मिती रेखा सुरेंद्र जगताप , शांताराम खंडू भोंडवे व वैशाली सुरेश चव्हाण प्राजक्ता एण्टरप्राईजेसच्या बॅनर अंतर्गत करण्यात आली आहे.

# शिल्पाचा बिझनेस माइंड



बॉलीवूडमधील सर्वात सक्सेसफुल अभिनेत्रींपैकी एक शिल्पा शेट्टी कुंद्रा आता एक यशस्वी बिझनेसवुमन म्हणून स्वत:ला प्रस्थापित करण्यात व्यस्त आहे. यासाठी तिने आपली व्यावसायिक जाण खूप चांगली विकसित केली आहे. शिल्पा शेट्टी कुंद्रा 2 कोटींच्या गुंतवणुकीतून 15 कोटींहून अधिक कमावणार आहे. MAMAEARTH चा IPO येताच त्यांच्या खिशात 15 कोटींहून अधिक रक्कम येईल. MAMAEARTH च्या मूळ कंपनीचे नाव HONASA CONSUMER आहे. MAMAEARTH च्या IPO चा प्राइस बँड 308 ते 324 रुपये प्रति इक्विटी शेअर घोषित करण्यात आला आहे. या पब्लिक इश्यूमधून गुंतवणूकदार पैसे कमावतील की नाही, हे शेअर्सच्या लिस्टनंतरच कळेल. IPO 31 ऑक्टोबर 2023 रोजी प्राथमिक बाजारात दाखल होईल. विशेष बाब म्हणजे बॉलीवूडची फिटेस्ट अभिनेत्री शिल्पा शेट्टी कुंद्रा आणि IPO च्या इतर प्रवर्तकांना 365 कोटी रुपयांच्या या IPO मधून अंदाजे 15.65 कोटी रुपये मिळतील. त्यामुळे, MAMAEARTH IPO कितीही लिस्ट केले तरी बी-टाउन अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या बँक खात्यात 15.65 कोटी रुपये येतील. MAMAEARTH IPO च्या ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस किंवा DRHP नुसार, शिल्पा शेट्टी कुंद्राचे नाव त्या प्रवर्तकांमध्ये आहे ज्यांनी MAMAEARTH च्या मूळ कंपनी HONASA CONSUMER LIMITED मधील त्यांचे स्टेक विकण्याची ऑफर दिली आहे.

# इमरान - जिनिलीया 15 वर्षांनी पुन्हा एकत्र!





२००८ साली आलेला जाने तु या जाने ना सिनेमा सर्वांना आठवत असेलच. या सिनेमाचं स्वतःचं एक वेगळं फॅन फॉलोईंग आहे. आजही हा सिनेमा पाहणारे असंख्य चाहते आहेत. अभिनेत्री जिनिलीया देशमुख आणि इमरान खान हे १५ वर्षांनी एकत्र आलेत. या दोघांना पाहुन चाहत्यांना जाने तु या जाने जा सिनेमाची आठवण आलीय. इमरान खान आणि जिनीलिया डिसूझा यांचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झालाय. त्यांच्या भेटीचा हा फोटो पाहून त्यांच्या चाहत्यांना मात्र आनंद झालाय. लीना अरान्हा नावाच्या एका इंस्टाग्राम यूजरने हा फोटो शेअर केला आहे. तिने याला कॅप्शन दिले, "या दोघांना भेटून नेहमीच आनंद होतो." या फोटोवर इमरानने कमेंट केलीय. या दोघांना १५ वर्षांनी एकत्र पाहुन सर्वांना जाने तु या जाने ना सिनेमाची आठवण आली इमरान खान जाने तू... या जाने ना, दिल्ली बेल्ली, लक, मेरे ब्रदर की दुल्हन, आय हेट लव स्टोरीज आणि एक मैं और एक तू अशा चित्रपटांसाठी ओळखला जातो. 2015 मध्ये तो कंगना रणौतसोबत कट्टी बट्टीमध्ये इमरान शेवटचा दिसला होता. तीन वर्षांनंतर, त्याने 'मिशन मार्स: कीप वॉकिंग इंडी' हा लघुपट दिग्दर्शित केला, जो त्याचा शेवटचा मुख्य प्रवाहातील सिनेमाचा प्रयत्न ठरला. त्यानंतर इमरान इंडस्ट्रीतुन गायब झाला. पण त्याचे चाहते त्याच्या कमबॅकची आतुरतेने वाट पाहत आहेत. जिनिलीया डिसूझाच्या वर्क फ्रंटबद्दल सांगायचं झालं तर २०२३ च्या सुरुवातीलाच वेड सिनेमाच्या माध्यमातुन जिनिलीयाने संपुर्ण महाराष्ट्राच्या मनामनात राज्य केलं. याशिवाय जिनिलीया लवकरच आमिर खानच्या 'सितारे जमीन पर' मध्ये झळकणार आहे. तिने 2003 मध्ये 'तुझे मेरी कसम' या चित्रपटातून पदार्पण केले होते.

# लंडन विद्यापीठाकडून ट्विंकलचा गौरव!



बॉलिवूड अभिनेत्री ट्विंकल खन्ना ही नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. ती आता जरी मोठ्या पडद्यापासून दूर असली तरी सोशल मिडियावर तिची चर्चा रंगतेच. कधी काळी मोठा पडदा गाजवणारी ट्विंकल ही आता वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. काही दिवसांपुर्वी ट्विंकलने ती मास्टर्स करायला लंडनला गेल्याचे एका पोस्टमधून चाहत्यांना सांगितले होते. आता नुकतच ट्विंकलने तिचा मित्र आणि चित्रपट निर्माता करण जोहरबद्दल असं काही वक्तव्य केलं की ज्याची सर्वत्र चर्चा रंगली आहे. ट्विंकलने सोशल मिडियावर एक पोस्ट शेयर केली आहे ज्यात तिने लंडन विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी पूर्ण केल्याबद्दल आणि कवानाघ पुरस्कार प्राप्त केल्याची माहिती चाहत्यांना दिली आहे. या पोस्टच्या कॅप्शनमध्ये ट्विंकलने लिहिले की, "एक मोठा क्षण, आणि सुरुवातीला मला ते सर्वांना सांगायला थोडी लाज वाटत होती. पण हा क्षण दाखवतो की वय ही खरोखर फक्त एक संख्या आहे. जी तुमची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तुमच्या मार्गात कधीच अडथळा आणत नाही. मला माझ्या फायनल प्रबंधासाठी पदवी मिळाली आहे. आता लंडन विद्यापीठाच्या गोल्डस्मिथ्सने पॅट कावनाघ पुरस्कारासाठी निवडले आहे. यानिमित्ताने मी सांगू इच्छितो की, कदाचित माझ्या जुन्या मित्राने 'स्टुडंट ऑफ द इयर'मध्ये चुकीच्या कलाकारांना कास्ट केले असावं. या पोस्टमध्ये तिने एक पत्रही शेअर केले आहे, ज्यात असे म्हटले आहे की तिचा पोर्टफोलिओ पॅट कवानाघ पुरस्कारासाठी निवडला गेला आहे, जो गोल्डस्मिथ्सच्या एमए इन क्रिएटिव्ह आणि लाइफ रायटिंग प्रोग्राममधील सर्वोत्कृष्ट कामासाठी दरवर्षी दिला जातो. आता ट्विंकलची ही पोस्ट सोशल मिडियावर व्हायरल झाली आहे. अनेक कलाकारांनी तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. तर ट्विंकल खन्नाचा पती अभिनेता अक्षय कुमारने देखील

# राकेश कुमारची उपांत्यपूर्व फेरीत धडक

## पॅरालिम्पिकच्या चौथ्या दिवशी मनीषा-नित्या उपांत्य फेरीत

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**पॅरालिम्पिकमध्ये भारताने आतापर्यंत चमकदार कामगिरी केली आहे. भारतीय खेळाडूंनी आतापर्यंत एकूण पाच पदके जिंकली आहेत. आतापर्यंत भारतीय खेळाडूंनी एक सुवर्ण, एक रौप्य आणि तीन कांस्य पदके जिंकली आहेत. चौथ्या दिवशी, पदकांची संख्या दुहेरी अंकात पोहोचू शकेल असे वाटले होते, मात्र भारताची पदरी निराशा आली आहे. परंतु, बॅडमिंटनपटू मनीषा रामदास आणि नित्या श्री सिवनने उपांत्य फेरीत आणि तिरंदाज राकेश कुमारने उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे.**





भारताची बॅडमिंटन स्टार मनीषा रामदास हिने महिला एकेरीच्या SU5 प्रकारातील उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या मामिको टोयोडा हिचा २१-१३, २१-१४ असा पराभव केला. त्याचबरोबर नित्या श्री सिवनने चमकदार कामगिरी केली आहे. महिलांच्या उपांत्यपूर्व फेरीतील सामना जिंकून तिने उपांत्य फेरीत धडक मारली आहे. नित्याने पोलंडच्या ऑलिव्हियाचा २१-४, २१-७ असा पराभव केला आहे. आता तिचा सामना चीनच्या लिन एस हिच्याशी होईल.तसेच तिरंदाज राकेश कुमारने चमकदार कामगिरी केली आहे. त्याने उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. राकेशने इंडोनेशियन आर्चरचा पराभव केला आहे.पॅरालिम्पिकच्या चौथ्या दिवसाची सुरुवात भारतासाठी खूपच खराब झाली. बॅडमिंटनपटू मनदीप कौरचा पॅरालिम्पिक २०२४ मधील प्रवास संपला आहे. तिचा नायजेरियाच्या मरियम बोलाजीने २१-८, २१-९ असा सरळ सेटमध्ये सहज पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. यानंतर पलक कोहलीलाही बॅडमिंटनमध्ये उपांत्यपूर्व फेरीत पराभव पत्करावा लागला आहे. तिला इंडोनेशियाच्या खेळाडूने २१-१९, २१-१५ ने पराभूत केले.पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताच्या रवी रोंगालीकडून पदक मिळवण्याची अपेक्षा होती, परंतु पुरुषांच्या F40 शॉट पुट्च्या अंतिम फेरीत पाचव्या स्थानावर राहून तो पदकापासून वंचित राहिला. गेल्या वर्षी चीनमधील आशियाई पॅरा गेम्समध्ये रौप्य पदक जिंकणाऱ्या रवीने १०.६३ मीटरची वैयक्तिक सर्वोत्कृष्ट कामगिरी नोंदवली असली, तरी तो पहिल्या तीनमध्ये पोहोचण्यात अपयशी ठरला.पॅरिस ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी गर्भवती पॅरा-तिरंदाज जोडी ग्रिनहॅमने महिलांच्या वैयक्तिक कंपाऊंडमध्ये पॅरालिंपिक्सजीबी संघ सहकारी आणि गतविजेत्या फोबी पॅटरसन पेनला हरवून कांस्यपदक जिंकले. तिने सात महिन्यांची गर्भवती असून कांस्यपदक जिंकले. जोडीला आशा आहे की तिची कामगिरी इतर अनेक मातांना प्रेरणा देईल. कारण जोडीच्या जन्मापासूनचा प्रवास सोपा नव्हता. जोडी ग्रिनहॅमचा जन्म झाला तेव्हा तिच्या डाव्या हाताला बोटं नव्हती. फक्त अर्धा अंगठा होता. तिला दोन वर्षांचा मुलगा आहे. याआधी ती तीनदा गरोदर राहूनही ती आई होऊ शकली नव्हती. अशा परिस्थितीत गर्भधारणेदरम्यान तिरंदाजी करणे केवळ शारीरिकच नाही तर मानसिकदृष्ट्याही कठीण असते. सेमीफायनल सामन्यादरम्यान जोडी ग्रिनहॅमला खूप त्रास झाला. या सामन्यादरम्यान तिचे मूल पोटात हालचाल करत होते आणि ती हरली. त्यामुळे तिला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.पॅरालिम्पिकमध्ये पदक जिंकण्यापूर्वी, जोडीने शेवटचा शनिवार व रविवार पॅरिसमधील रुग्णालयात घालवला होता. कारण तिचे बाळ हालचाल करत नव्हते. तिच्या मुलाच्या हृदयावर सतत लक्ष ठेवण्यात येत होते. प्रशिक्षणादरम्यान, ती मुलाच्या अनपेक्षित हालचालींची तयारीही करत होती. ती आता तिच्या मुलाला सांगू शकणार आहे की, जगात येण्यापूर्वीच तो पोडियमवर पोहोचला होता.जोडी ग्रिनहॅमने तिच्याच देशाची ॲथलीट फोबी पॅटरसन पाइन हिला पराभूत करून कांस्यपदक जिंकले. दोघीही एकमेकांच्या चांगल्या मैत्रिणी आहेत. ३१ वर्षीय जोडीने कांस्यपदक जिंकून इतिहास घडवला आणि गर्भवती महिलांना एक संदेश दिला. ती म्हणाली, "आयुष्यात तुम्हाला जे करायचं ते करा. जर तुम्ही आनंदी आणि निरोगी असाल आणि बाळ निरोगी आणि सुरक्षित असेल, तर तुम्ही तुमचे कोणतेही काम करत राहू शकता. यामध्ये कोणतीही अडचण येत नाही."जोडी ग्रिनहॅम पुढे म्हणाली, "ऑर्थोडॉक्स श्रद्धा पाळू नयेत. तुम्हाला जॉगिंग करायचे असेल किंवा जिमला जायचे असेल तर काही फरक पडत नाही. त्याचा तुमच्यावर किंवा बाळावर कोणताही परिणाम होणार नाही ना याची काळजी घ्या. या सर्वांसाठी तुम्हाला तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा लागेल. जर तुमच्या डॉक्टरांनी परवाणगी दिली, तर तुम्ही तुम्हाला हवं ते करु शकता."

### जोडी ग्रिनहॅमने घडवला इतिहास

जोडी ग्रिनहॅमने तिच्याच देशाची ॲथलीट फोबी पॅटरसन पाइन हिला पराभूत करून कांस्यपदक जिंकले. दोघीही एकमेकांच्या चांगल्या मैत्रिणी आहेत. ३१ वर्षीय जोडीने कांस्यपदक जिंकून इतिहास घडवला आणि गर्भवती महिलांना एक संदेश दिला. ती म्हणाली, "आयुष्यात तुम्हाला जे करायचं ते करा. जर तुम्ही आनंदी आणि निरोगी असाल आणि बाळ निरोगी आणि सुरक्षित असेल, तर तुम्ही तुमचे कोणतेही काम करत राहू शकता. यामध्ये कोणतीही अडचण येत नाही."ग्रिनहॅमने महिलांच्या वैयक्तिक कंपाऊंडमध्ये पॅरालिंपिक्सजीबी संघ सहकारी आणि गतविजेत्या फोबी पॅटरसन पेनला हरवून कांस्यपदक जिंकले.

# रहाणे टीम इंडियात पुनरागमन करण्यास सज्ज!

## काउंटी चॅम्पियनशिपमध्ये शतक झळकावत दिले संकेत

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अजिंक्य रहाणे बऱ्याच दिवसांपासून टीम इंडियातून बाहेर आहे. मात्र शतक झळकावून त्याने पुन्हा एकदा भारतीय संघाचे दार ठोठावले आहे. रहाणेने काउंटी चॅम्पियनशिप डिव्हिजन टू २०२४ च्या सामन्यात लीसेस्टरसाठी शतक झळकावले. त्याने शतकी खेळी करत लीसेस्टरशायर संघाला ३०० धावांचा पल्ला गाठून देत मजबूत स्थितीत पोहोचवले. रहाणेने भारत-बांगलादेश कसोटी मालिकेपूर्वी शतक झळकावल्याने त्याच्या टीम इंडियात पुनरागमनाच्या आशा वाढल्या आहेत.**



अजिंक्य रहाणेने टीम इंडियासाठी शेवटचा कसोटी सामना जुलै २०२३ मध्ये खेळला होता. या सामन्यानंतर तो टीम इंडियामध्ये पुनरागमन करु शकला नाही. आता भारत आणि बांगलादेश यांच्यात १९ सप्टेंबरपासून कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेपूर्वी रहाणेने आपल्या कामगिरीत सातत्य ठेवले, तर त्याला लवकरच टीम इंडियात संधी दिली जाऊ शकते.वास्तविक, काउंटी चॅम्पियनशिपमध्ये कार्डिफमध्ये लीसेस्टरशायर आणि ग्लॅमॉर्गन यांच्यात सामना खेळला जात आहे. या सामन्यादरम्यान लिसेस्टरशायरच्या दुसऱ्या डावात रहाणे चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आला होता. त्याने १९२ चेंडूत १०२ धावा केल्या. रहाणेने या खेळीत १३ चौकार आणि एक षटकारही लगावला. या शतकानंतर तो सोशल मीडियावर ट्रेंड करू लागला. अजिंक्य रहाणेबाबत अनेक पोस्ट शेअर करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये तो लवकर भारतीय कसोटी संघात स्थान मिळवेल, असे बोलले जात आहे. त्याने टीम इंडियासाठी आतापर्यंत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. रहाणेने ८५ कसोटी सामन्यात ५०७७ धावा केल्या आहेत. या कालावधीत त्याने १२ शतके आणि २६ अर्धशतके झळकावली आहेत.

### लीसेस्टरशायरसाठी झळकावले शतक

आता भारत आणि बांगलादेश यांच्यात १९ सप्टेंबरपासून कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेपूर्वी रहाणेने आपल्या कामगिरीत सातत्य ठेवले, तर त्याला लवकरच टीम इंडियात संधी दिली जाऊ शकते.वास्तविक, काउंटी चॅम्पियनशिपमध्ये कार्डिफमध्ये लीसेस्टरशायर आणि ग्लॅमॉर्गन यांच्यात सामना खेळला जात आहे. या सामन्यादरम्यान लिसेस्टरशायरच्या दुसऱ्या डावात रहाणे चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आला होता.